# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ

'विद्याविहार', पो. लोणेरे- ४०२ १०३, ता. माणगाव
जिल्हा- रायगड. (महाराष्ट्र राज्य) भारत.

registrar@dbatu.ac.in    दुरध्वनी क्रमांक : 02140-275142/275212


---

क्रमांक : डॉ.बाआंतंवि/शै. वि./स्कॉलरशिप/२०२१-२२/ 104
दिनांक : २७/०९/२०२१

शैक्षणिक विभाग

## नोटीस

शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ मध्ये महा डिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती करीता विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केलेले आहेत. परंतु काही विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना चुकीचे कागदपत्र जोडल्यामुळे सदरचे अर्ज त्यांना चुका सुधारण्याकरीता परत (Sent back) पाठविण्यात आलेले आहेत. सदर अर्जामधील असलेल्या चुकांची दुरुस्ती करुन अर्ज (reapply) पुन्हा सादर करण्यासाठी दिनांक ३०/०९/२०२१ पर्यंत महाडिबीटी पोर्टलवर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांना वारंवार सुचना दिलेल्या असुन देखील अर्जामधील त्रुटींची पुर्तता करुन अर्ज (reapply) सादर केलेले नाहीत. तरी **सबंधीत विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, आपण भरलेला शिष्यवृत्ती अर्ज नामंजुर (Reject) झाल्यास याची संपुर्ण जबाबदारी त्या संबंधीत विद्यार्थ्याची असेल तसेच सदर विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती न मिळाल्यामुळे विद्यापीठाची त्या वर्षाची खुल्या प्रवर्गाची संपुर्ण प्रवेश शुल्क आकारण्यात येईल. याची सबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

ज्या विद्यार्थ्याचे शिष्यवृत्तीचे अर्ज उत्पन्नाच्या दाखल्याकरीता परत पाठविण्यात आले असतील त्यांच्या शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ शिष्यवृत्ती करीता एक वर्षाच्या उत्पन्न दाखल्याची वैधता ३१ मार्च २०२१ असणे अपेक्षित होते. परंतु काही विद्यार्थ्यांनी दिनांक ३१ मार्च २०२१ नंतर उत्पन्नाचे दाखले काढल्यामुळे उत्पन्न दाखल्याची वैधता ३१ मार्च २०२२ अशी आहे.

**सदर विद्यार्थ्यांनी सन २०१८-१९, २०१९-२०२०, २०२०-२०२१ असे ०३ वर्षाचे उत्पन्न दर्शविलेला उत्पन्न दाखला काढुन शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडायचा आहे. तसेच विद्यार्थ्यांना आपल्या लॉगीन मधुन (Scrutiny remark) पाहणी करुन दिलेल्या त्रुटींची पुर्तता करुन अर्ज सादर करायचे आहेत.**
अधिक माहीतीसाठी विद्यापीठातील शैक्षणिक विभागाशी संपर्क साधावा.

27/09/21
कार्यालय अधिक्षक
शैक्षणिक विभाग

प्रति,

१. सर्व विद्यार्थी
२. नोटीस बोर्ड (सुचना फलक)
३. वेबसाईटवर माहितीकरीता.

प्रत:- मा. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणरे - रायगड यांना माहितीसाठी सादर.